# मेट्रो-३च्या कामाचा लेखाजोखा व्हिडीओ रूपात संग्रही राहणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सरकारने मेट्रोचे जाळे निर्माण करण्यास सुरुवात केली. मेट्रो-३ ही संपूर्णता भूमिगत असून यासाठी एकूण १७ टीबीएम मशीन भूगर्भात सोडण्यात आल्या आहेत. सोबत ८००० कुशल-अकुशल कर्मचारी अहोरात्र झटत आहेत. याद्वारे भुयारे खणण्यात मिळालेले यश आणि कामाची इत्थंभूत माहिती व्हिडीओ स्वरूपात संग्रही करण्यात आली असून तो व्हिडीओ मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने नुकताच जारी केला आहे. त्यामुळे भविष्यात अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना मेट्रोच्या कामकाजाची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

एमएमआरसीएलद्वारे कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो मार्गाचे काम २०१७ मध्ये सुरू करण्यात आले. पहिले टीबीएम मशीन धारावीच्या भूगर्भात सोडण्यात आल्यानंतर मेट्रोच्या भुयार खणण्याच्या कामाला सुरुवात झाली.

मुंबईसारख्या बेटावर भुयारी मेट्रो मार्ग साकार होणे असे केवळ स्वप्न वाटत असतानाच एमएमआरसीएलने हे आव्हान सहजरीत्या पेलले आहे. मुंबईची वाढती लोकसंख्या पाहता भविष्यात दळणवळणाच्या दृष्टीने मेट्रो-३ व्यावसायिक क्षेत्रातून जात असल्याने या मार्गाचा सर्वाधिक फायदा नोकरदारवर्गाला होणार आहे.

आजमितीपर्यंत या मार्गावर २२.५ किमीचे भुयार खणण्यात यश मिळाले असून स्टील डेकिंगचे काम पूर्ण झाले आहे. सध्या नालेसफाईचेही काम अत्यंत वेगाने सुरू असून, या कामामुळे मुबई तुंबण्याचे प्रमाण कमी होईल, असेही एमएमआरसीएलकडून सांगण्यात आले.